# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५७/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हसन शेखलाल नदाफ,<br>मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. हसन शेखलाल नदाफ, मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. २२.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. ७१४ येथे ३ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. २३.७.२०१० रोजी रु. ४०००/- पावती क्र. ५३४५५४७ नुसार भरले आहेत. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २८.९.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. १५.११.२०११ रोजी कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत कालावधीत वीज पुरवठा देण्यात यावा असे आदेश दिले, परंतु आजतागायत वीज पुरवठा मिळाला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज पुरवठा देण्याचे वि.प.ला आदेश व्हावेत, विलंबाबद्दल भरपाई मिळावी, विलंबाची निश्चिती झाली नसलेस कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाईसाठी वेगळा अर्ज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ५.१.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने त्यांच्या नवीन शेतीपंप कनेक्शनसाठी दि. २३.७.२०१० ला चलन भरल्याचे मान्य केले व चाचणी अहवाल दि. २.५.२०११ रोजी दिला असल्याचे म्हटले आहे . त्यांचे एकूण ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. एप्रिल २०१० ते मार्च २०११ पर्यंतची कामे मार्च २०१२ पर्यंत करण्याचे उद्दीष्ट आहे. तक्रारदाराचे काम विहीत मुदतीत पूर्ण करण्यात येईल. तसेच संख उप विभागात असणारा डोंगराळ भाग यामुळे वीज पुरवठा देण्यास विलंब झालेला आहे. ही बाब लक्षात घेवून त्यांनी मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. कदम उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ११ पोलचे काम आहे ते दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करुन ग्राहकास वीज जोडणी देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज पुरवठा करण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी नवीन शेतीपंप वीज पुरवठा मिळणेसाठी चलन भरुन चाचणी अहवाल वितरण कंपनीकडे दिला आहे. अंतर्गत कक्षाचे आदेश दि.१५.११.२०११ रोजी होऊनही तक्रारदारास अद्याप वीज जोडणी दिली नाही. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी कंपनीच्या उद्दीष्टां नुसार दि. ३१.३.२०१२ पर्यंत ग्राहकास वीज पुरवठा देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले. ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील नियम ८.२ नुसार तक्रारदाराचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश वि.प.ला मंच करु शकतो. या ठिकाणी वि.प.ने दि. ३१.३.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्याचे कबूल केले आहे. मुद्दा क्र.१ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. ग्राहक विलंबाबत संभ्रमातअसलेने, विलंबाची निश्चिती झाली नसलेस कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाईसाठी वेगळा अर्ज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वि.प.ने कार्यवाही न केल्यास ग्राहक भरपाई मिळण्यास हक्कदार आहे, त्याचा भरपाईचा हक्क अबाधीत राहतो. ग्राहक स्वतंत्ररित्या अर्ज करु शकतो, त्यासाठी परवानगीची आवश्यकता वाटत नाही. खालील प्रमाणे आदेश -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## <u>आदेश</u>

१) तक्रार अशंत: मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास दि. ३१.३.२०१२ पर्यंत वीज जोडणी देऊन वीज पुरवठा सुरु करावा, तसा अहवाल मंचास द्यावा.

३) ग्राहक विलंबापोटी भरपाईबाबत स्वतंत्ररित्या अर्ज करु शकतो, असे मंच निरीक्षण नोंदवित आहे .

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com